IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 2, March 2026
Impact Factor: 8.2

# महानुभव पंथातील चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांचा भारतीय ज्ञानपरंपरेच्या (IKS) संदर्भात तात्त्विक व शैक्षणिक अभ्यासाची समकालीन प्रासंगिकता

**प्रा. डॉ. बालासाहेब किलचे**
सहयोगी प्राध्यापक, श्री नाथ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पैठण, जिल्हा: छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्र

*सारांश:*
*भारतीय ज्ञाना परंपरा ही केवळ ग्रंथिक स्वरूपाची नसून ती भारतीय परंपरेनुसार भारतीय समाज जीवनाशी निगडित आहे. भारतीय ज्ञानपरंपरेने आपली ज्ञानपरंपरा जपणूक करून या ज्ञानपरंपरेचा समृद्ध वारसा हा येणाऱ्या पिढीसाठी तयार करून ठेवला आहे आणि तो समृद्ध वारसा समकालीन स्वरूपात आणून त्याची समकालीन उपयुक्तता तपासणी हे आज काळाची गरज आहे. भारतीय ज्ञान परंपरेचा विचार करता उपनिषद, गीता, जैन, बौद्ध तत्त्वज्ञान, संत साहित्य, भक्ती परंपरा या साहित्यात ज्ञानप्रसारासाठी वेगवेगळे दृष्टांत, उपमा, कथा, यांचा वापर करण्यात आलेला आहे. या दृष्टांत, उपमा, कथांच्या आधारे ही ज्ञानपरंपरा तत्कालीन परिस्थितीत लोकांना समजावून सांगितलेली आहे.*
*महानुभव पंथ हा महाराष्ट्रातील एक प्राचीन व महत्त्वाचा भक्तीपर धार्मिक पंथ आहे. या पंथाचे प्रवर्तक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामीहे आहेत. हा पंथ प्रामुख्याने एकेश्वरवाद, नैतिक आचरण, संयम, त्याग आणि सदाचार यांवर आधारित आहे.*
*महानुभव पंथात श्रीकृष्णालाच परब्रह्म मानले जाते. जातिभेद, कर्मकांड, बाह्य आडंबर यांना विरोध करून सर्वसामान्य जनतेला समतेचा आणि विवेकाचा मार्ग दाखवणे हा या पंथाचा मुख्य उद्देश होता. स्त्रिया व शूद्र यांनाही अध्यात्मिक साधनेचा समान अधिकार देणे हे या पंथाचे वैशिष्ट्य आहे.*
*महानुभव पंथाची साहित्यपरंपरा अत्यंत समृद्ध आहे. त्यामध्ये ‘लीळाचरित्र’, ‘सिद्धांतसूत्रपाठ’, ‘दृष्टांतपाठ’ इत्यादी ग्रंथांमधून चक्रधर स्वामींचे तत्त्वज्ञान, जीवनदर्शन आणि उपदेश स्पष्टपणे प्रकट होतात. त्या दृष्टिकोनातून श्री चक्रधर स्वामी निरुपित दृष्टांतपाठ हे अत्यंत महत्त्वाचे असून त्या दृष्टांत*

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 2, March 2026
Impact Factor: 8.2

***पाठाच्या आधारे तत्कालीन समाज जीवनाचे दर्शन कोणत्या पद्धतीचे होते आणि ते कसे असावे याचे उत्कृष्ट मार्गदर्शन या दृष्टांतपाठाद्वारे करण्यात आलेले आहे. एकूणच, महानुभव पंथ हा समाजसुधारणा, नैतिक मूल्ये आणि भारतीय ज्ञानपरंपरा यांचा सुंदर संगम घडवून आणणारा पंथ म्हणून ओळखला जातो. दृष्टांतपाठाद्वारे प्राप्त होणारे भारतीय ज्ञानाची समकालीन उपयुक्तता तपासताना या संशोधनाद्वारे चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांना समकालीन शिक्षण, मूल्यशिक्षण आणि शिक्षक प्रशिक्षणाच्या संदर्भात पुनर्स्थापित करणे ही आहे.***

**प्रस्तावना:**

भारतीय ज्ञानपरंपरा (Indian Knowledge Systems – IKS) ही केवळ शास्त्रीय ग्रंथांपुरती मर्यादित नसून ती लोकजीवनाशी निगडित अध्यात्म, नीतिशास्त्र, शिक्षणपद्धती व सामाजिक मूल्यांचा समन्वय आहे. भारतीय ज्ञान परंपरेचा विचार करता उपनिषद, गीता, बौद्ध-जैन साहित्य, भक्तीपरंपरा यांतून ज्ञान प्रसारासाठी दृष्टांत, उपमा, कथा आणि रूपकांचा वापर मोठ्या प्रमाणात झालेला आहे.

महानुभव पंथाचे प्रवर्तक चक्रधर स्वामी यांनी सामान्य जनतेसाठी अध्यात्म व मोक्षतत्त्व सोप्या भाषेत समजावून सांगण्यासाठी वेगवेगळ्या दृष्टांतांची रचना केलेली आहे. हे दृष्टांत वैराग्य, आत्मज्ञान, कर्मफल, भक्ति, समता व नैतिकतेचे तत्त्व लोकजीवनातील उदाहरणांतून स्पष्ट करतात. म्हणून चक्रधर स्वामींचे दृष्टांत हे सामान्य जनतेला अध्यात्म, मोक्षतत्त्व, नैतिकता व समतेचे शिक्षण देणारे लोकाभिमुख साधन आहेत.भारतीय ज्ञानपरंपरेने कथा, दृष्टांत व रूपकांच्या माध्यमातून अध्यात्मिक तत्त्वांचे लोकाभिमुख शिक्षण दिलेले असल्यामुळे चक्रधर स्वामींचे दृष्टांत ही परंपरा पुढे नेणारे आहेत.

सध्याच्या IKS अभ्यासात प्रामुख्याने वैदिक, उपनिषदिक व शास्त्रीय ग्रंथांवर भर आहे; मात्र IKS अभ्यासात आजही मराठी संतपरंपरेचा सुसंगत, तुलनात्मक व शैक्षणिक विश्लेषणात्मक अभ्यास मर्यादित आहे. म्हणून हा प्रकल्प IKS फ्रेमवर्कमध्ये महानुभव परंपरेचे स्थान स्पष्ट करतो. या प्रकल्पाच्या माध्यमातून चक्रधर स्वामींनी सांगितलेल्या दृष्टांतांचे भारतीय ज्ञानपरंपरेशी असलेले तात्त्विक, नैतिक व शैक्षणिक नाते उलगडणे हा प्रस्तुत प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 2, March 2026
Impact Factor: 8.2

**संशोधन साहित्याचा आढावा:**

सदर शोधनिबंध हा महानुभव पंथातील चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांचा भारतीय ज्ञानपरंपरेच्या (Indian Knowledge Systems IKS) संदर्भात तात्त्विक व शैक्षणिक अभ्यास करण्यावर केंद्रित आहे. भारतीय ज्ञानपरंपरेत ज्ञान हे केवळ ग्रंथाधारित किंवा सैद्धांतिक न राहता, अनुभव, आचरण आणि जीवनदृष्टी यांच्याशी निगडित मानले जाते. या परंपरेत दृष्टांत, उपमा, कथा आणि संवाद यांद्वारे ज्ञानप्रसाराची समृद्ध परंपरा आढळते. चक्रधर स्वामींनी वापरलेली दृष्टांत पद्धत ही अशाच लोकाभिमुख, अनुभवाधिष्ठित आणि मूल्याधारित शिक्षणपद्धतीचे महत्त्वपूर्ण उदाहरण आहे.

या शोधनिबंधाचे विषयगत केंद्र म्हणजे चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांमधील तात्त्विक आशय, ज्ञानमीमांसा, नैतिक मूल्ये आणि शैक्षणिक उपयुक्तता यांचा IKS च्या चौकटीतून अभ्यास करणे. प्रकल्पात दृष्टांतांचा केवळ साहित्यिक किंवा धार्मिक अभ्यास न करता, त्यांना भारतीय ज्ञानपरंपरेतील ज्ञान-संप्रेषणाचे साधन, व्यवहारज्ञानाचा स्रोत आणि जीवनदर्शनाचा अविष्कार म्हणून समजून घेण्याचा प्रयत्न केला जाईल. उपनिषदकालीन संवादपरंपरा, बौद्ध व जैन दृष्टांत साहित्य तसेच भक्ती चळवळीतील शिक्षणपद्धती यांच्याशी तुलना करून महानुभव दृष्टांतांची वैशिष्ट्ये अधोरेखित केली जातील.

या संशोधनाची मूलभूत कल्पना म्हणजे चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांना समकालीन शिक्षण, मूल्यशिक्षण आणि शिक्षक प्रशिक्षणाच्या संदर्भात पुनर्स्थापित करणे ही आहे. भारतीय ज्ञानपरंपरेच्या पुनरुज्जीवनाच्या पार्श्वभूमीवर हा प्रकल्प पारंपरिक ज्ञानस्रोत आणि आधुनिक शिक्षणव्यवस्था यांमधील सेतू निर्माण करेल. त्यामुळे हा प्रकल्प तत्त्वज्ञान, शिक्षणशास्त्र आणि IKS या केंद्रित क्षेत्रांमध्ये एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक योगदान देणारा ठरेल.

**(कोलते वि.भि.(संपा),१९७८)** संपादित लीळाचरित्र ग्रंथातील विवेचन पाहताना मराठीतील आद्यग्रंथ म्हणून लीळाचरित्राकडे पाहिल्या जाते असे नमूद करण्यात आलेले आहे. हा ग्रंथ १२०८ मध्ये म्हणजेच ज्ञानेश्वरीच्या अगोदर चार वर्षे लिहिल्या गेला आहे. हा ग्रंथ मराठी गद्यात लिहिलेला आहे. लीळाचरित्र हा ग्रंथ अध्यात्मिक असून अलौकिक प्रमाणे लौकिक जीवनाचे दर्शन घडवणारा आहे.लीळाचरित्र हा महानुभाव संप्रदायाचा प्रमुख ग्रंथ असून भारतीय ज्ञान परंपरेतील ज्ञानसंप्रेषण, नैतिक शिक्षण, तत्त्वज्ञान व सामाजिक सुधारणा यांचे प्रभावी साधन आहे.एकंदरीतच या ग्रंथात महानुभव पंथाच्या सर्वज्ञ चक्रधर स्वामींच्या आठवणी विस्तारित स्वरूपात दिलेल्या आहेत त्यामुळे हा ग्रंथ सदर संशोधनाचा पाया ठरणारा आहे.

**(निळकंठ बळवंत भावाळकर, हरी नारायण नेने,१९३७)** दृष्टांतपाठ ग्रंथात केशिराजांनी निर्मित ११४ दृष्टांत पाठाची सविस्तर मांडणी यात केलेली आहे. सांप्रदायिकांच्या पद्धतीनें दृष्टांत पाठाची विभागणी केल्यास दृष्टांत

१-१० हे दैवाद्य, ११-६८ पुरुषाद्य, ६२-७० दैवांत ७१-७६ संन्यास, ७७-८४ जिज्ञासू, ८५-८९ असंनिधानधर्म, ९०-९५ साधनविघ्न, ९६-९८ विघ्नहानी आणि ९९-११४ हे दृष्टांत साध्यव्य-वस्था अशा क्रमानें होते असे या ग्रंथात सविस्तर विवेचन केलेले आहे.

**(महंत परमानंद दास महानुभाव,२००४, )** भगवान श्री चक्रधर निरुपित ब्रह्मविद्या शास्त्रांतर्गत दृष्टांत पाठ या ग्रंथात उद्देश, सुत्र,आणि लीला संबंध याचे मांडणी करून ११४ दृष्टांताची मांडणी सविस्तरपणे केलेली आहे.

**(भादंककर मीनाक्षी सुभाष,२०२० )** महानुभव पंथाचे संस्कृत साहित्याला योगदान या ग्रंथात महानुभावपंथाचा अभ्यास करण्यात येऊन, महानुभाव पंथातील साहित्य यामध्ये चरित्रात्मक तत्त्वज्ञानात्मक आणि स्त्रोत्र वांग्मय आणि महानुभाव पंथ आणि संस्कृत साहित्य आणि त्यातून होणारे मूल्य शिक्षण याचे सविस्तर विवेचन केलेले आहे.

**(सोलापूरे सुशीला( संपा.),२००४)** यांनी सर्वज्ञ श्री चक्रधरस्वामी निरुपित आचार्य श्री केशिराजबास संकलित दृष्टांतपाठाचे संपादन केले असून, सदर ग्रंथात दृष्टांतपाठाची संहिता, दृष्टांतसार, शब्दार्थ, याचे विवेचन करून मूळ लीळाचरित्रातील ११४ दृष्टांताची मांडणी सविस्तरपणे केलेली आहे.

**(हंसराज जाधव,२०२१)** मराठी विश्वकोशासाठी दृष्टांतपाठाचे लेखन केले आहे.श्री चक्रधर स्वामींनी आपले तत्वज्ञान विशद करण्यासाठी आपल्या चार शिष्यांना सांगितलेले जे दृष्टांत आहेत ते दृष्टांत पाठ या नावाने ओळखले जातात याची मांडणी विश्वकोश मध्ये केली आहे.

**(सचिन राजपूत,२०२२)** महानुभव संप्रदायातील प्रमाण विचार ह्या शोधनिबंधात ज्ञानमीमांसेचा विचार करता भारतीय तत्त्वज्ञानात ज्ञानमीमांसेची सुरुवात प्राचीन न्यायदर्शना पासून झालेली आहे. ज्ञान प्रमाण ज्ञान प्राप्त करताना त्या ज्ञानाचे प्रमाण काय आहे हे तपासणी जरुरीचे आहे आणि त्या दृष्टिकोनातून तत्त्वज्ञानाच्या ज्ञानमीमांसेचा विचार करता महानुभव पंथातील ज्ञानाचे प्रमाण शोधण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या शोधनिबंधात केला आहे.

याव्यतिरिक्तही महानुभव पंथाचे साहित्य आणि दृष्टांत पाठ या विषयाचे अनेक लेखकांनी केलेले आहे.

## आयकेएस मिशनमध्ये योगदान

हा शोध निबंध भारतीय ज्ञानपरंपरेच्या (IKS) तत्त्वज्ञान, अध्यापन पद्धती, मूल्यशिक्षण आणि लोकभाषेतील ज्ञानप्रसार यांच्याशी सुसंगत असल्यामुळे IKS च्या उद्दिष्टानुसार स्थानिक/प्रादेशिक ज्ञानपरंपरेचे शास्त्रीय दस्तऐवजीकरण व पुनरुज्जीवन या प्रकल्पातून साध्य होण्यास हातभार लागेल. या संशोधन प्रकल्पातून महानुभव परंपरेतील चक्रधर स्वामींचे दृष्टांत आत्मज्ञान, मोक्ष, कर्म, भक्ति, वैराग्य, नैतिकता व सामाजिक समता यांचा

पुरस्कार करताना वेगवेगळ्या शैक्षणिक मूल्यांची निर्मिती करण्यावर भर देतात तसेच शिक्षणातील मूळ संकल्पना समजावून सांगताना वेगवेगळ्या दृष्टांत आणि दाखल्यांचा वापर करण्यासाठी हे दृष्टांत पाठ उपयुक्त पडतात.

एकंदरीतच भारतीय ज्ञान परंपरेचा विचार करता हा संशोधन प्रकल्प IKS च्या मूलभूत चौकटीशी संबंधित असल्यामुळे या विषयाच्या अनुषंगाने पुढील बाबी अधिक स्पष्ट होतात.

- Paramparic Knowledge (परंपरागत ज्ञान): महानुभव पंथ व संतसाहित्य
- Darśana & Moksha-Centric Thought: आत्मज्ञान, वैराग्य, कर्म, भक्ति
- Pedagogy of IKS: दृष्टांत/कथा/उपमा आधारित लोकशिक्षण
- Ethics & Social Values: समता, अहिंसा, करुणा, आचारशुद्धता
- Bhasha-based Knowledge: लोकभाषेत (मराठी) ज्ञानप्रसार

त्यामुळे वरील बाबींचा विचार करता पारंपारिक ज्ञान, या पारंपारिक ज्ञानाचा आधार दृष्टांत कथा उपमा यावर आधारित लोकशिक्षण हे असल्यामुळे पारंपारिक ज्ञानातून आत्मज्ञानाची संकल्पना वैराग्य कर्म भक्ती लोकजीवन समाज जीवन या विषयाच्या अनुषंगाने प्राप्त होणारे लोकशिक्षण आणि त्या लोकशिक्षणाच्या माध्यमातून नैतिक आणि सामाजिक नीतिमूल्य ही लोकभाषेतून ज्ञानप्रसारित करण्यासाठी उपयुक्त ठरतात

**महत्त्व:**

भारतीय ज्ञानपरंपरा (Indian Knowledge Systems – IKS) ही केवळ प्राचीन तात्त्विक संकल्पनांचा संग्रह नसून, ती समाजजीवन, शिक्षणपद्धती, नैतिक मूल्ये व मानवी आचरण यांना दिशा देणारी समग्र विचारप्रणाली आहे. या परंपरेतून उद्भवलेल्या विविध संप्रदायांनी ज्ञानाच्या लोकाभिमुख प्रसारासाठी नाविन्यपूर्ण शैक्षणिक साधनांचा अवलंब केला. त्यात महानुभव पंथाचे प्रवर्तक चक्रधर स्वामी यांनी वापरलेली 'दृष्टांत' पद्धत ही भारतीय शिक्षणपरंपरेतील एक महत्त्वपूर्ण पण तुलनेने अल्प-अभ्यासित अंग आहे.

चक्रधर स्वामींचे दृष्टांत हे केवळ धार्मिक उपदेश नसून, ते तात्त्विक चिंतन, नैतिक बोध आणि व्यवहाराधिष्ठित ज्ञान यांचे प्रभावी संप्रेषण करणारे शैक्षणिक माध्यम आहेत. सहज, सोपी आणि अनुभवप्रधान भाषा वापरून त्यांनी सामान्य जनतेपर्यंत ब्रह्मज्ञान, वैराग्य, अहिंसा, समता आणि विवेक या संकल्पना पोहोचवल्या. ही पद्धत उपनिषदकालीन संवादपरंपरा, बौद्ध जातककथा, जैन दृष्टांत साहित्य आणि भगवद्गीतेतील उदाहरणात्मक शिक्षणशैली यांच्याशी सुसंगत असून, त्यामुळे ती भारतीय ज्ञानपरंपरेच्या व्यापक चौकटीत अभ्यासण्यास योग्य ठरते.

समकालीन काळात शिक्षणक्षेत्रात मूल्याधिष्ठित शिक्षण, जीवनकौशल्ये, नैतिकता, अनुभवाधिष्ठित शिक्षण (Experiential Learning) आणि कथनाधारित शिक्षण (Narrative Pedagogy) यांना वाढते महत्त्व दिले जात आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (NEP 2020) देखील भारतीय ज्ञानपरंपरेच्या पुनरुज्जीवनावर भर देते. या पार्श्वभूमीवर चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांचा तात्त्विक व शैक्षणिक अभ्यास करणे अत्यंत प्रासंगिक ठरते. त्यांच्या दृष्टांतांमधून समावेशकता, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता, भोगवादाविरोधी विचार आणि नैतिक जीवनमूल्ये प्रभावीपणे प्रतिबिंबित होतात, जे आजच्या सामाजिक व शैक्षणिक आव्हानांशी थेट संबंधित आहेत.

तथापि, आतापर्यंत झालेले बहुतेक संशोधन हे साहित्यिक, धार्मिक किंवा ऐतिहासिक दृष्टिकोनातून मर्यादित राहिलेले दिसून येते. भारतीय ज्ञानपरंपरेच्या (IKS) चौकटीतून चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांचा तात्त्विक आशय, ज्ञानमीमांसा, शैक्षणिक उपयुक्तता आणि समकालीन शिक्षणाशी असलेले नाते यांचा सखोल अभ्यास तुलनेने कमी झाला आहे. त्यामुळे या क्षेत्रात संशोधनाची स्पष्ट गरज निर्माण झाली आहे.

या शोधनिबंधात चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांचा IKS संदर्भात अभ्यास करून भारतीय पारंपरिक शिक्षणपद्धतींची आधुनिक शिक्षणव्यवस्थेशी सांगड घालण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. हा अभ्यास शिक्षक प्रशिक्षण, मूल्यशिक्षण, नैतिक शिक्षण तसेच उच्च शिक्षणातील भारतीय ज्ञानपरंपरा अभ्यासक्रमासाठी उपयुक्त ठरेल. अशा प्रकारे प्रस्तुत संशोधन प्रकल्प भारतीय ज्ञानपरंपरेच्या संवर्धनासोबतच समकालीन शैक्षणिक धोरणांना सैद्धांतिक व व्यवहार्य आधार प्रदान करेल, हीच या संशोधनाची मूलभूत आवश्यकता व औचित्य आहे.

**उद्दिष्टे : Objectives and timelines (250 words):**

- चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांचे तात्त्विक विश्लेषण करणे.
- या दृष्टांतांची उपनिषद, भगवद्गीता, बौद्ध-जैन तत्त्वज्ञानाशी तुलना करणे.
- दृष्टांतांमधील मोक्ष, कर्म, भक्ति, वैराग्य, नैतिकता व समता या संकल्पनांचे वर्गीकरण करणे.
- भारतीय ज्ञानपरंपरेतील लोकशिक्षण पद्धतीशी दृष्टांतांची सुसंगती स्पष्ट करणे.
- आधुनिक शिक्षणासाठी दृष्टांताधारित मूल्यशिक्षण मॉडेल विकसित करणे.

**गृहीतकृत्ये:**

- दृष्टांत हे भारतीय ज्ञानपरंपरेचे लोकभाषेतील तात्त्विक रूपांतर आहेत.
- दृष्टांतामध्ये उपनिषदिक, गीता व भक्तीपरंपरेतील तत्त्वांचा समन्वय आहे.

- दृष्टांतांमध्ये उपनिषदिक आत्मज्ञान, गीतेचा कर्मयोग व भक्तीपरंपरेचे मूल्य एकात्मतेने आढळते.
- दृष्टांताधारित शिक्षण ही IKS मधील प्रभावी अध्यापनपद्धती आहे.

**कार्यपद्धती: Methodology:**

सदर संशोधन हे गुणात्मक संशोधन असून या गुणात्मक संशोधनासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात येईल. एकंदरीतच सदर संशोधनासाठी अनेक संशोधन पद्धतीच एकत्रित करून एकत्रित मिश्र संशोधन कार्यपद्धती वापरण्यात येईल.

सदर संशोधनाच्या तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यमस्तोत्राचा वापर करण्यात येईल करण्यात येईल. यामध्ये प्रामुख्याने प्राथमिक स्तोत्रांमध्ये लीळाचरित्र, स्मृतिस्थळे, महानुभव साहित्य, तसेच निरीक्षण मुलाखती यांचा प्रामुख्याने वापर करण्यात येईल.

दुय्यम स्तोत्रामध्ये प्रकाशित अप्रकाशित साहित्यामध्ये उपनिषद, गीता, बौद्ध-जैन तत्त्वज्ञानावरील ग्रंथ, भारतीय ज्ञानपरंपरेविषयी उपलब्ध संदर्भ साहित्याचा वापर करण्यात येईल.

प्राथमिक व दुय्यम स्तोत्रांमधून उपलब्ध होणाऱ्या तथ्यांचे विषाणुरूप सांकेतिकीकरण करुन विषयानुसार वर्गीकरण, तुलनात्मक अभ्यास आणि विश्लेषण केल्यानंतर निष्कर्षाची मांडणी केल्या जाईल.

**चर्चा:**

महानुभाव पंथातील साहित्यांचा विचार करता दृष्टांत पाठ हे अत्यंत महत्त्वाचे स्तोत्र आहेत. सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी आपल्या भक्तांना वेळोवेळी उपदेश करताना जे दृष्टांत सांगितले आहेत ते लीळाचरित्रात मोठ्या प्रमाणात विखुरलेले आहेत. केशिराज बासानी या दृष्टांताचे संकलन करून दृष्टांत पाठाची निर्मिती केलेली आहे.

**दृष्टांत म्हणजे काय?**

कोणालाही एखादी गोष्ट समजावून सांगत असताना ती गोष्ट इतरांना माहीत नाही या उद्देशाने आपण समजावून सांगतो पण ते समजावून सांगत असताना वेगवेगळ्या उदाहरणांचा, दाखल्यांचा, पुराव्यांचा आपण आधार घेत असतो. या सर्व गोष्टी इतरांना माहीत असतात त्या संदर्भात आपण त्यांची दाखले देत असतो. हे दाखले आपण एक प्रमाण म्हणून मानतो आणि या प्रमाणातूनच वेगवेगळ्या दृष्टांताची निर्मिती होताना दिसून येते.

विश्वनाथ बासांनी लिहिलेल्या १६व्या शतकातील 'दृष्टांतस्थळ' या ग्रंथात दृष्टांताची व्याख्या पुढील प्रमाणे दिली आहे 'दृष्टाच्या अंती अदृष्ट बुझवीले म्हणौनि दृष्टांत बोलिजे', तसेच 'लक्षणरत्नाकर' या आनेराज व्यासांच्या ग्रंथात 'येन दृष्टं प्रमेयान्तस्तं दृष्टान्तः प्रचक्षते ।' अशी व्याख्या केली आहे. काव्यप्रकाशकार मम्मटाचार्यांनी 'दृष्टान्तः पुनरेतेषां सर्वेषां प्रतिबिम्बनम्।' अशी दृष्टांताची व्याख्या केली आहे. बत्तीस लक्षणांची टीप यात 'दृष्टादृष्ट निरपूनि तत्सादृश्ये दृष्टादृष्ट बुझविजे तो दृष्टांतसूत्रम' अशी व्याख्या केलेली आहे." **(भादंककर,२०२० )**

वरील व्याख्यांचा विश्लेषणात्मक सार पाहता एखाद्या गोष्ट संकल्पना समजण्यासाठी जे रोजच्या दैनंदिन जीवनातील उदाहरणे, दाखले दिले जातात त्यास दृष्टांत म्हणता येईल. एकंदरीतच सोप्या उदाहरणांच्या साहाय्याने गूढ तत्त्वज्ञान स्पष्ट करणे म्हणजे दृष्टांत या संकल्पनेकडे पाहिले जाते.

**दृष्टांताचे प्रकार -**

लक्षणरत्नाकरात आनेराज व्यासांनी दृष्टांताचे सहा प्रकार सांगितले आहेत. ते खालीलप्रमाणे -

अंशग्राह्यः समग्रांशोऽन्वयोऽप्रत्यन्वयस्तथा।

वास्तवो योगजोऽर्थेषु दृष्टान्तः षड्विधः स्मृतः।।

**(भादंककर,२०२० )**

दृष्टांतपाठाच्या स्वरूपाची चर्चा करताना असे लक्षात येते की दृष्टांत पाठ हे केवळ संकलनात्मक स्वरूपाचे नसून वास्तविकतेचे भान ठेवून ठेवून मानवी समाज जीवनाचे दर्शन घडवणारी किमया या दृष्टांत पाठातून दिसून येते त्यामुळे हे दृष्टांत पाठ कथात्मक + बोधात्मक + प्रतीकात्मक + तात्त्विक + लोकाभिमुख असे समन्वयात्मक (Integrated) आहेत. एकंदरीत श्री चक्रधर स्वामी उपदेश करताना सभोवतालच्या जीवन व्यवहारातील दाखले देऊन समाज जीवन समजविण्याचा प्रयत्न स्वामीजींच्या तत्त्वज्ञानात्मक उपदेशात्मक दिसून येतो त्यामुळे हे दृष्टांतपाठ जीवन व्यवहाराशी निगडित आहेत आणि जीवन व्यवहाराशी निगडित असल्यामुळे या दृष्टांत पाठाचे सर्वसामान्यांना सहजतेने आकलन करून देतात.

**श्री सर्वज्ञ चक्रधर स्वामी निरुपित दृष्टांतपाठ**

श्री केशिराजबास संकलित दृष्टांताची संख्या ही ११४ असून त्या दृष्टांताची संहिता ही थोडक्यात सांगता येईल.

दृष्टांत अतुलाचा, दृष्टांत बाहिरीलाचा, दृष्टांत उंबरे यावारीलाचा, दृष्टांत कुकडीएचा, मासळीयेचा, कासवियेचा, शब्दवेधीयारसाचा, समुद्राचा, सोमकांताचा, हिरेखाण्यियाचा, वेवाचा, रहाटघडीयेचा, माळेकराचा, डोळेयाचा,

खंडेया खबुटेचा, बांदकर्रीयाचा, काकसुकराचा, लाडाचीए बासीचा, बांधलीये गायीचा, वटबाजीचा, तुपाभाताची या घसाचा, पाणीयातुला गुंडेयाचा, तनधैलेया वावराचा, दृष्टांत रुम्हणेयाचा, हत्तीचा, कर्मचांडळाचा हे काही दृष्टांत आहेत दृष्टांत आहेत.

उदाहरणार्थ आपण एक दृष्टांत या ठिकाणी पाहणार आहोत तो पुढील प्रमाणे आहे.

**दृष्टांत रुम्हणेयाचा**

**कव्हणी एक दुधाचे गुणवीसेष अन्मोदीत होते: तेथ जात्यांध होता: तेणे पुसीलेः हां गा दूध ते कैसे: दूध ते पांढरे: पांढरे ते कैसे: पांढरे ते बव्हे सरिखे: बव्हे ते: कैसे:बव्हे ते रूभनीया सारखे: रूभने ते कैसे: रूभ ने ते ऐसे: म्हणूनही हात वाकूडा करुनी दाखविला: मंग एक दिसे ते रुभणे कोठा देखीले: तथा अंगणी देखीले:हात वाकुनि पाहिला: दूध ते ऐसे हे म्हणौनि पेवो लागला :हीरडीया फुटती रगत नीगे: आरे हे काइ करितासी: ना दूध पितायेः अरे सांडि: सांडी: हे रूभनेः ना माझे मी बापे सांघितले: हिरडीया फुटती: दुःख होए परि न संडी**

एकजण दुधाची चर्चा करीत होता तेवढ्यात एक आंधळा मनुष्य तिथे आला त्यांनी दुधाची प्रशांसा एकूण विचारले काहो दूध कसे असते? चर्चा करणाऱ्या माणसाने सांगितले दूध पांढरे असते, आंधळ्याने पुन्हा विचारले पांढरे म्हणजे कसे?, त्यावर तो बनतो पांढरे म्हणजे बगळ्या सारखे, आंधळा पुन्हा विचारतो बगळाचा कसा असतो? तो म्हणाला रुभण्यासारखा, आंधळा पुन्हा विचारतो रूभनेच कशे असते? हात वाकडा करून रूभ ने हे असे असते असे त्याला सांगितले. एके दिवशी गोठ्यात किंवा अंगणात हे रूम होणे त्या आंधळ्याला दिसते आणि हात वाकडा करून दूध समजून त्या रूभण्यास तू तोंड लावून पितो परंतु वास्तविक पाहता ते खरे दूध नसल्यामुळे त्या आंधळ्या व्यक्तीच्या हिरड्या फुटून रक्त बाहेर येते त्यावेळी त्या आंधळ्याच्या जवळ उभा असलेला व्यक्ती त्याला विचारतो हे काय करतोस? तो म्हणतो मी दूध पितोय त्यावरील ती समोरील व्यक्ती म्हणते अरे सोडून टाक ते दूध नाही रूभने आहे याने तुझ्या हिरड्या फुटतील, त्यावर तो आंधळा म्हणतो नाही नाही हे माझ्या बापाने सांगितले आहे ते दूध आहे, आणि म्हणून तो आंधळा ते रुभणे सोडत नाही आणि शेवटी दूध म्हणून ते रूभणे तोंडात घेतल्यामुळे त्या रूभण्याचा मार त्याच्या हिरड्याला लागतो, त्या आंधळ्या व्यक्तीच्या हिरड्या फुटतात त्यातून रक्त बाहेर येते तरी तो ते रुभणे सोडत नाही.

एकंदरीतच या दृष्टांता वरून असे निदर्शनास येते की एखाद्या व्यक्तीला एखादी जी गोष्ट आपण सांगितली ती गोष्ट त्याच्या डोक्यात पक्की बसते परंतु त्या गोष्टींचा तो ती गोष्ट खरी आहे का खोटी आहे याचा शहनिशा न करता समोरच्या व्यक्तींवर तो अंधविश्वास ठेवतो आणि त्यातून स्वतःचा नाश करून घेतो हे या ठिकाणी सांगितलेले आहे त्यामुळे या दृष्टांतातून स्वामींना असे सांगायचे आहे की जर आपल्याला एखादी गोष्ट माहीत नसेल किंवा इतरांनी सांगितली म्हणून त्यावर विश्वास आपण ठेवत असाल तर ती गोष्ट आपण जाणीवपूर्वक समजून घेतली पाहिजे म्हणजे या ठिकाणी आपल्या विवेकाचा वापर आपण स्वतः केला पाहिजे जर स्वतःच्या विवेकाचा वापर केला नाही त्यामुळे त्या आंधळ्याच्या हिरड्या फुटल्या तसे आपले नुकसान होऊ नये हे या ठिकाणी सांगणे आहे म्हणून या दृष्टांताच्या माध्यमातून विवेक मूल्य रुजवण्याचे काम या दृष्टांताद्वारे केल्या जाते.

असे अनेक महत्त्वाचे दृष्टांत श्री चक्रधर स्वामींनी निरूपित केलेले आहेत आणि त्या दृष्टांतातून वेगवेगळी मूल्य विकसित होतात आणि ती मूल्य विकसित करण्याचे काम समकालीन शिक्षण व्यवस्थेमध्ये आपल्याला करणे गरजेचे आहे आणि त्या दृष्टिकोनातून या संशोधनातून महानुभव पंथातील चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांचा भारतीय ज्ञानपरंपरेच्या (IKS) संदर्भात तात्त्विक व शैक्षणिक अभ्यासाची समकालीन प्रासंगिकता तपासली जाणार आहे आणि त्यातून भारतीय ज्ञानपरंपरेतील लोकशिक्षण पद्धतीशी दृष्टांतांची सुसंगती स्पष्ट करून.आधुनिक शिक्षणासाठी दृष्टांताधारित मूल्यशिक्षण मॉडेल विकसित केल्या जाणार आहे.

**शोधनिबंधाची बौद्धिक गुणवत्ता:**

या शोधनिबंधाचा बौद्धिक आशय हा महानुभव पंथातील चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांचा भारतीय ज्ञानपरंपरेच्या (Indian Knowledge Systems – IKS) संदर्भात तात्त्विक, ज्ञानमीमांसात्मक आणि शैक्षणिक पुनर्वाचन करण्यावर केंद्रित आहे. भारतीय ज्ञानपरंपरेत ज्ञान हे केवळ सैद्धांतिक किंवा ग्रंथाधारित नसून, ते अनुभव, आचरण आणि जीवनदृष्टी यांच्याशी अविभाज्यरित्या जोडलेले आहे. या दृष्टिकोनातून चक्रधर स्वामींचे दृष्टांत हे IKS मधील ज्ञान-संप्रेषणाचे एक अद्वितीय आणि प्रभावी माध्यम म्हणून उदयास येतात.

प्रस्तावित संशोधनाअंतर्गत सोडवले जाणारे प्रमुख मूलभूत प्रश्न पुढील प्रमाणे आहेत.

(१) चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांमधील ज्ञानाची रचना (Structure of Knowledge) ही भारतीय ज्ञानपरंपरेतील कोणत्या ज्ञानमीमांसात्मक परंपरेशी सुसंगत आहे?

(२) दृष्टांत हे अध्यात्मिक उपदेशापुरते मर्यादित न राहता लौकिक जीवनातील नैतिक, सामाजिक व शैक्षणिक प्रश्न कसे सोडवतात?

(३) अनुभवाधारित, कथनात्मक आणि संवादात्मक शिक्षणपद्धती म्हणून दृष्टांतांचा वापर भारतीय पारंपरिक शिक्षणपद्धतीत कसा झाला आहे?

(४) समकालीन शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण आणि मूल्यशिक्षणाच्या संदर्भात या दृष्टांतांची उपयुक्तता कोणत्या स्वरूपात अधोरेखित करता येईल?

ज्ञान/परंपरा (Knowledge & Tradition) संदर्भातील बौद्धिक योगदान

या प्रकल्पाचे प्रमुख बौद्धिक योगदान म्हणजे चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांना IKS च्या चौकटीतून एक स्वतंत्र ज्ञानपरंपरा म्हणून मांडणे. उपनिषदांतील संवाद, बौद्ध जातककथा, जैन दृष्टांत परंपरा आणि भक्ती चळवळीतील लोकाभिमुख शिक्षणशैली यांच्या तुलनेत महानुभव दृष्टांत हे साधेपणा, तर्कसंगती आणि नैतिक व्यवहार्यता या त्रिसूत्रीवर आधारित आहेत. या संशोधनामुळे भारतीय ज्ञानपरंपरेतील लोकज्ञान (Folk Knowledge) आणि शास्त्रीय ज्ञान यांमधील सेतू स्पष्ट केला जाईल.

**विज्ञान/लौकिक प्रयोग (Empirical & Practical Wisdom) संदर्भातील योगदान**

चक्रधर स्वामींचे दृष्टांत हे निरीक्षण, अनुभव आणि लौकिक जीवनातील घटनांवर आधारित असल्याने ते भारतीय ज्ञानपरंपरेतील अनुभवाधिष्ठित ज्ञान (Experiential Knowledge) या संकल्पनेचे प्रत्यक्ष उदाहरण ठरतात. हा प्रकल्प दृष्टांतांमधील व्यवहारज्ञान, सामाजिक मानसशास्त्र, नैतिक निर्णयप्रक्रिया आणि मानवी आचरण यांचा अभ्यास करून भारतीय ज्ञानपरंपरेतील विज्ञानसदृश (systematic yet experiential) विचारपद्धती अधोरेखित करेल. त्यामुळे IKS ही केवळ अध्यात्मिक नसून, जीवनोपयोगी आणि प्रयोगशील ज्ञानपरंपरा असल्याचे अधोरेखित होईल.

**जीवनदर्शन/दृष्टी (Worldview & Philosophy of Life) संदर्भातील अद्वितीय योगदान**

या संशोधनाचा एक महत्त्वाचा बौद्धिक पैलू म्हणजे चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांमधून साकार होणारी जीवनदृष्टी. वैराग्य, अहिंसा, समता, अनासक्ती आणि विवेक ही मूल्ये केवळ उपदेशात्मक न राहता, जीवनातील निर्णयप्रक्रियेचे मार्गदर्शक तत्त्व म्हणून कशी कार्य करतात हे या अभ्यासातून स्पष्ट केले जाईल. समकालीन समाजात मूल्यसंघर्ष, नैतिक संभ्रम आणि उपभोक्तावादाच्या पार्श्वभूमीवर ही जीवनदृष्टी अत्यंत सुसंगत ठरते.

**IKS मधील बौद्धिक मूल्य**

हा प्रकल्प IKS मधील एक दुर्लक्षित पण महत्त्वपूर्ण ज्ञानस्रोत पुन्हा केंद्रस्थानी आणतो. चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांचा तात्त्विक व शैक्षणिक पुनर्विचार करून भारतीय ज्ञानपरंपरेतील कथनाधारित ज्ञान, अनुभवाधिष्ठित शिक्षण आणि नैतिक विवेक यांचे एकात्मिक मॉडेल प्रस्तुत केले जाईल. हे मॉडेल समकालीन शिक्षण, शिक्षक

प्रशिक्षण आणि मूल्यशिक्षणासाठी सैद्धांतिक व व्यवहार्य मार्गदर्शन देईल हेच या संशोधनाचे प्रमुख बौद्धिक वैशिष्ट्य आणि IKS मधील अद्वितीय योगदान आहे.

## निष्कर्ष आणि परिणाम

### निष्कर्ष:

- चक्रधर स्वामींचे दृष्टांत हे भारतीय ज्ञानपरंपरेतील (IKS) अनुभवाधिष्ठित, कथनाधारित व लोकाभिमुख ज्ञान-संप्रेषणाचे स्वतंत्र मॉडेल आहे.
- दृष्टांतांमधील ज्ञानरचना ही उपनिषदकालीन संवादपरंपरा, बौद्ध जातककथा व भक्ती परंपरेशी सुसंगत असूनही स्वतंत्र तात्त्विक ओळख निर्माण करते.
- दृष्टांत हे केवळ धार्मिक उपदेश नसून ते ज्ञानमीमांसा, नैतिक तर्क, सामाजिक व्यवहारज्ञान आणि जीवनदर्शन यांचे एकात्मिक स्वरूप दर्शवतात.
- चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांमधून समता, अहिंसा, अनासक्ती, वैराग्य, विवेक आणि श्रमप्रतिष्ठा ही मूल्ये व्यवहाराधिष्ठित पद्धतीने मांडलेली दिसून येतात.
- महानुभव दृष्टांतांमध्ये लोकज्ञान (Folk Knowledge) आणि शास्त्रीय ज्ञान यांमधील सेतू स्पष्टपणे दिसून येतो, जो IKS च्या मूलभूत तत्त्वांशी सुसंगत आहे.
- दृष्टांत-आधारित शिक्षणपद्धती ही समकालीन Experiential Learning, Narrative Pedagogy आणि Value-based Education यांच्याशी प्रभावीपणे सुसंगत ठरते.
- चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांमधून सामाजिक विषमता, भोगवाद, अहंकार आणि नैतिक अधःपतन यांवर तात्त्विक व व्यावहारिक उपाय सुचविलेले आहेत.
- या दृष्टांतांमध्ये मांडलेली जीवनदृष्टी ही शाश्वत विकास, मर्यादित उपभोग आणि पर्यावरणीय नैतिकता यांसाठी भारतीय तात्त्विक आधार प्रदान करते.
- भारतीय ज्ञानपरंपरेच्या अभ्यासात महानुभव पंथ आणि चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांचे योगदान पूर्वी अपेक्षित तेवढे अधोरेखित झाले नव्हते, ही संशोधनातील महत्त्वाची निष्पत्ती ठरणार आहे.
- प्रस्तुत संशोधनामुळे IKS च्या चौकटीत दृष्टांत-आधारित शैक्षणिक मॉडेल विकसित करण्याची सैद्धांतिक व व्यावहारिक शक्यता तयार झाली आहे.

IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 2, March 2026 Impact Factor: 8.2

- शिक्षक प्रशिक्षण, मूल्यशिक्षण आणि उच्च शिक्षणातील IKS अभ्यासक्रमांसाठी चक्रधर स्वामींचे दृष्टांत उपयुक्त अध्यापनाचे प्रभावी साधन ठरू शकतात.
- चक्रधर स्वामींचे दृष्टांत हे भारतीय ज्ञानपरंपरेतील ज्ञान, विज्ञानसदृश व्यवहारबुद्धी आणि जीवनदर्शन यांचे समन्वित उदाहरण असल्याचे या संशोधनातून सिद्ध झाले आहे.

**A. Tangible Outputs (स्पष्ट निष्पत्ती)**

- चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांचे IKS-आधारित तात्त्विक व शैक्षणिक विश्लेषण करणारा सविस्तर संशोधन अहवाल तयार होईल.
- दृष्टांतांचे तात्त्विक, नैतिक व शैक्षणिक वर्गीकरण करणारा संरचित डेटा तयार होइल.
- भारतीय ज्ञानपरंपरेच्या चौकटीत दृष्टांत-आधारित शिक्षण मॉडेल म्हणून विकसित करता येईल. (IKS Pedagogical Model)
- शिक्षक प्रशिक्षणासाठी दृष्टांत-आधारित मूल्यशिक्षण मॉड्यूल तयार केल्या जाईल.

**B. Intellectual and Academic Outcomes (बौद्धिक व शैक्षणिक परिणाम)**

- महानुभव पंथातील दृष्टांतांचे IKS मधील स्वतंत्र ज्ञानपरंपरा म्हणून सैद्धांतिक अधिष्ठान विकसित करता येईल.
- भारतीय कथनाधारित व अनुभवाधिष्ठित शिक्षणपद्धतीचे शास्त्रीय पद्धतीने पुनर्मूल्यांकन होईल.
- लोकज्ञान (Folk Knowledge) आणि शास्त्रीय ज्ञान यांतील संबंध स्पष्ट करणारी संकल्पनात्मक चौकट तयार होईल.
- तत्त्वज्ञान, शिक्षणशास्त्र आणि भारतीय परंपरा यांतील आंतरविद्याशाखीय संवादास चालना मिळेल.

**C. Societal and Applied Outcomes (सामाजिक व उपयोजित परिणाम)**

- मूल्याधिष्ठित, समावेशक व नैतिक शिक्षणासाठी भारतीय संदर्भातील सुसंगत मॉडेल दृष्टांत पाठाच्या आधारे तयार केल्या जाईल.
- शिक्षक, विद्यार्थी व संशोधकांमध्ये भारतीय ज्ञानपरंपरेविषयी जागरूकता वाढवण्यासाठी दृष्टांत पाठ उपयुक्त ठरतात.
- सामाजिक समता, अहिंसा व नैतिक विवेक या मूल्यांचे शैक्षणिक पुनरुज्जीवन करण्यास दृष्टांत पाठ हातभार लावतात.

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in
DOI: 10.48175/568

- शाश्वत जीवनशैली व पर्यावरणीय नैतिकतेसाठी भारतीय ज्ञानपरंपरेच्या माध्यमातून दृष्टांत पाठ तात्त्विक आधार निर्माण करतात.
- स्थानिक बौद्धिक परंपरांच्या जतन व संवर्धनास दृष्टांत पाठ मदत करतात .

**D. Long-term Outcomes (दीर्घकालीन परिणाम)**

- IKS-आधारित पुढील संशोधन प्रकल्पांसाठी संदर्भ चौकट तयार होईल.
- भारतीय तत्त्वज्ञान व शिक्षणपरंपरेवरील संशोधनाची गुणवत्ता व दृश्यमानता वाढ विण्यासाठी दृष्टांत पाठ उपयुक्त ठरणार आहेत.
- भारतीय ज्ञानपरंपरे आणि समकालीन शिक्षणव्यवस्थेचे प्रभावी एकत्रीकरण होईल.

सदर शोधनिबंधाचे व्यापक परिणाम (Broader Impacts) सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय या तिन्ही स्तरांवर भारतीय ज्ञानपरंपरेच्या (Indian Knowledge Systems – IKS) समग्र दृष्टिकोनाशी सुसंगत आहेत. चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांचा तात्त्विक व शैक्षणिक अभ्यास हा केवळ शैक्षणिक संशोधनापुरता मर्यादित न राहता समाजजीवनाच्या विविध अंगांवर सकारात्मक प्रभाव टाकण्याची क्षमता बाळगतो.

सामाजिक पातळीवर, चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांमधून समता, अहिंसा, करुणा, अनासक्ती आणि नैतिक विवेक यांसारखी मूल्ये अधोरेखित होतात. या संशोधनाच्या माध्यमातून मूल्याधिष्ठित शिक्षणासाठी भारतीय संदर्भात सुसंगत अभ्याससामग्री विकसित होऊ शकते, जी शाळा, महाविद्यालये आणि शिक्षक प्रशिक्षण संस्थांमध्ये वापरता येईल. यामुळे सामाजिक सलोखा, समावेशकता आणि नैतिक जबाबदारीची जाणीव वृद्धिंगत होण्यास मदत होईल.

आर्थिक दृष्टीने, महानुभव पंथाची साधेपणा, मर्यादित उपभोग आणि श्रमप्रतिष्ठा यावर आधारित जीवनदृष्टी ही समकालीन शाश्वत विकासाच्या (Sustainable Development) संकल्पनांशी सुसंगत आहे. या संशोधनातून उद्भवणारे निष्कर्ष धोरणकर्ते, शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक संस्थांना मूल्याधिष्ठित आर्थिक आचरण, जबाबदार उपभोग आणि सामाजिक उद्यमशीलतेसाठी वैचारिक आधार देऊ शकतात.

पर्यावरणीय स्तरावर, चक्रधर स्वामींच्या दृष्टांतांतील अनासक्ती, संयम आणि प्रकृतीशी सुसंवाद साधण्याची भूमिका ही पर्यावरणीय नैतिकतेशी (Environmental Ethics) जोडलेली आहे. भारतीय ज्ञानपरंपरेतील मानव–निसर्ग सुसंवादाची संकल्पना या संशोधनातून अधोरेखित होईल, ज्यामुळे पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृतीस हातभार लागेल.

एकूणच, हा शोधनिबंध IKS च्या आधारे सामाजिक मूल्यसंवर्धन, शाश्वत आर्थिक विचार आणि पर्यावरणीय जाणीव यांना एकत्रित करणारा बहुआयामी प्रभाव निर्माण करेल, हीच या प्रकल्पाची व्यापक सामाजिक उपयुक्तता आहे.

## संदर्भ ग्रंथ Reference


- आवलगावकर, रमेश (संपा.). (१९९९). स्मृतिस्थळ. पुणे: चंद्रकला प्रकाशन.
- कुलकर्णी, श्री. रं. (१९७०). प्राचीन मराठी गद्य प्रेरणा आणि परंपरा. मुंबई: सिंधू पब्लिकेशन्स.
- कोलते, वि. भि. (१९७५). महानुभाव तत्त्वज्ञान. मलकापूर: अरुण प्रकाशन.
- कोलते, वि. भि. (१९७५). महानुभावांचे आचारधर्म. मलकापूर: अरुण प्रकाशन.
- कोलते, वि. भि. (संपा.). (१९७८). लीळाचरित्र. पुणे: महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.
- गाडगीळ, स. रा. (१९७९). वैदिक यज्ञ, मध्ययुगीन तंत्रसाधना आणि ज्ञानेश्वरप्रणित भक्तियोग. पुणे: रामचंद्र दास्ताने आणि कंपनी.
- जोशी, वसंत स. (संपा.). (१९८१). भाषा व साहित्य संशोधन (खंड १). पुणे: महाराष्ट्र साहित्य परिषद.
- जोशी, वसंत स., & जोगळेकर, गं. ना. (संपा.). (१९८५). भाषा व साहित्य संशोधन (खंड २). पुणे: महाराष्ट्र साहित्य परिषद.
- जोशी, वसंत स., अदवंत, म. ना. (संपा.). (१९८९). भाषा व साहित्य संशोधन (खंड ३). पुणे: महाराष्ट्र साहित्य परिषद.
- ढवळे, वि. ना. (१९८४). साहित्याचे तत्त्वज्ञान. पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन.
- ढवळे, वि. ना. (१९९७). साहित्याचे नवीन भाषातत्त्वज्ञान. पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन.
- ढेरे, रा. चिं. (१९७२). प्राचीन मराठी नवधारा. कोल्हापूर: मोघे प्रकाशन.
- ढेरे, रा. चिं. (१९७८). संतसाहित्य व लोकसाहित्य काही अनुबंध. पुणे: श्रीविद्या प्रकाशन.
- तुळपुळे, शं. गो. (१९७३). यादवकालीन मराठी भाषा (दुसरी आवृत्ती). पुणे: व्हीनस प्रकाशन.
- देशमुख, उषा. (१९८२). मराठी साहित्याचे आदिबंध. मुंबई: लोकवाङ्मय गृह.
- देशमुख, उषा. (१९९४). मराठी संशोधनविद्या. पुणे: स्नेहवर्धन प्रकाशन.
- दांडेकर, शं. वा. (१९९६). वारकरी पंथाचा इतिहास. आळंदी: धार्मिक वाङ्मय प्रकाशन मंडळ संस्था.
- दीक्षित, श्रीनिवास, दीक्षित, मीनाक्षी. (१९७३). भारतीय तत्त्वज्ञान (दुसरी आवृत्ती). कोल्हापूर.

- पठाण, यू. म. (१९७३). महानुभाव साहित्यसंशोधन (खंड १). औरंगाबाद: मराठवाडा विद्यापीठ प्रकाशन.
- पांगारकर, ल. रा. (१९३२). मराठी वाङ्मयाचा इतिहास (खंड १–४). पुणे: पांगारकर ल. रा. (प्रकाशक).
- बकहिरट, भा. पं., & भालेराव, अ. ज्ञा. (१९७२). वारकरी संप्रदाय आणि तत्त्वज्ञान. पुणे: व्हीनस प्रकाशन.
- बेडेकर, दि. के. (१९६४). अस्तित्ववादाची ओळख. पुणे: व्हीनस प्रकाशन.
- बहिरट, भा. पं., भालेराव, अ. ज्ञा. (१९७२). वारकरी संप्रदाय: उदय व विकास. पुणे: व्हीनस प्रकाशन.
- भादंककर, मीनाक्षी सुभाष. (२०२०). महानुभव पंथाचे संस्कृत साहित्याला योगदान. रामटेक: कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ.
- भावाळकर, निळकंठ बळवंत, नेने, हरी नारायण. (१९३७). सर्वज्ञ चक्रधर निरुपित दृष्टांतपाठ. (प्रकाशक माहिती उपलब्ध नाही).
- भोळे, चं. भा. (संपा.). (२००७). संशोधनाची क्षितिजे (दुसरी आवृत्ती). औरंगाबाद: साकेत प्रकाशन.
- महंत, परमानंद दास (महानुभाव). (२००४). भगवान श्री चक्रधर निरुपित ब्रह्मविद्या शास्त्रांतर्गत दृष्टांतपाठ. 📝
- मंचरकर, र. बा. (२०००). धर्मसंप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी वाड्मय. पुणे: प्रतिमा प्रकाशन.
- माटे, श्री. म. (१९५७). संत, पंत व तंत. पुणे: ठोकळ प्रकाशन.
- रेगे, मे. पुं. (१९७७). तत्त्वज्ञानमीमांसा. मराठी विश्वकोश (खंड ७). मुंबई: महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.
- लोखंडे, भ. वा. (१९७९). मराठी संतसाहित्यावर बौद्ध धर्माचा प्रभाव. नागपूर: अशोक प्रकाशन.
- वाळिंबे, रा. शं. (१९७४). साहित्यातील संप्रदाय. पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन.
- सरदार, गं. बा. (१९६३). संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती (दुसरी आवृत्ती). पुणे: महाराष्ट्र साहित्य परिषद.
- सुंठणकर, बा. र. (१९४८). महाराष्ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य. बेळगाव:
- सोलापूरे, सुशीला. (संपा.). (२००४). सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी निरुपित आचार्य श्री केशिराजबास संकलित दृष्टांतपाठ. औरंगाबाद: कैलास पब्लिकेशन.
- संत, दु. का. (१९८५). शोधविज्ञान कोश. पुणे: पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन.
- **संशोधनात्मक लेख (Journal / Online Articles)**
- राजपूत, सचिन. (२०२२). महानुभव संप्रदायातील प्रमाण विचार. Electronic International

IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

ISSN: 2581-9429

Volume 6, Issue 2, March 2026

Impact Factor: 8.2

Interdisciplinary Research Journal (EIIRJ), ISSN 2277-8721.

- जाधव, हंसराज. (२०२१). दृष्टांतपाठ. मराठी विश्वकोश. https://marathivishwakosh.org/55617/